महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

## नियामक मंडळाची १७ वी बैठक, दि.०५.०७.९९

मा. ना. एकनाथरावजी खडसे, मा. मंत्री (पा) व अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची १७ वी बैठक दि.०५.०७.९९ रोजी मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये खालील ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र. १७/१

''ठराव करण्यात येतो की १६ व्या बैठकीमध्ये पारित झालेले ठराव क्र.१६/१ ते १६/२० कायम करण्यात येत आहेत.''

ठराव क्र.१७/१(अ)

'' ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कार्यक्षेतील प्रकल्पांसाठी सामाजिक व आर्थिक अभ्यास करण्यासाठी 'मिटकॉन, पुणे' या संस्थेने महामंडळाचे अधिकाऱ्यांसह सदर अभ्यासाची व्याप्ती व त्यांबद्दल द्यावयाच्या मोबदल्यामध्ये काटकसर करण्याच्या दृष्टीकोनातून मा.विनय बन्सल, प्रधान सचिव, (नियोजन) व सदस्य यांच्याबरोबर चर्चा करावी.''

ठराव क्र. १७/२

''ठराव करण्यात येतो की, परिशिष्ट क्र.२/१ मधील बिगर सिंचन पाणी पुरवठा मिळण्याबाबतच्या ५ योजनांचे प्रस्तावांना, सदर प्रस्तावांचा पाणीवापर संबंधित प्रकल्पाच्या सुधारित जलनियोजनामध्ये समाविष्ट केला जाईल व दोन महिन्यांच्या पाणीपट्टीएवढी अनामत रक्कम महामंडळाकडे पाणीवापर करणारी संस्था भरेल. तसेच १९९० च्या शासन निर्णयानुसार आवश्यक तो संतुलन साठा (Balancing storage) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण स्वखर्चाने करील, या अटींवर नियामक मंडळाची मान्यता कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. १७/२ (अ)

''ठराव करण्यात येतो की, बिगर सिंचन परवान्यां संदर्भात संबधित संस्थेने महामंडळाबरोबर विहीत नमुन्यात करारनामा केल्याशिवाय सदर संस्थेस योजनेचे काम सुरु करण्यास परवानगी देऊ नये. तसेच आतापर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ज्या योजनांना मंजूरी दिलेली आहे त्या सर्व योजनांचे करारनामे झाल्याशिवाय पुढील मंजुऱ्या देण्यात येऊ नयेत.''

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे



DIR MEET 17_resolution

ठराव क्र. १७/२ (ब)

``ठराव करण्यात येतो की, ज्या प्रकल्पांच्या नियोजनात बिगरसिंचन मागण्यांमुळे १५ टक्के पेक्षा जास्त पाणी कपात होणार आहे अशा ठिकाणी संबंधित संस्थेने बिगरसिंचन पाणी वापराच्या प्रमाणात साठ्याची प्रमाणात किंमत (Proportional cost) भरल्याशिवाय पाणी परवाना देऊ नये.''

ठराव क्र. १७/२ (क)

``ठराव करण्यात येतो की,ज्या योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून स्थानिक स्वराज्य संस्थाकडे हस्तांतरीत झाल्या आहेत त्यांच्याकडून प्रलंबित असलेली थकबाकी वसूल झाल्याशिवाय येथून पुढे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कोणत्याही नव्या योजनेस बिगरसिंचन परवाना देण्यात येऊ नये''.

ठराव क्र. १७/३

``ठराव करण्यात येतो की, सन १९९९-२००० या आर्थिक वर्षात रुपये २४०० कोटी खुल्या बाजारातून निधीची उभारणी करण्याबाबत चक्री पध्दतीने पारित केलेला ठराव क्र.१७/१ (भाग १ ते ५) त्यामधील भाग-३ मध्ये शासनाची हमी फी २% अंतर्भूत करण्याच्या दुरुस्तीसह कायम करण्यात येत आहे.

ठराव क्र. १७/४

``ठराव करण्यात येतो की,दि.१.४.१९९६ पूर्वी महामंडळाचे कार्यक्षेत्रातील कामांवरील कंत्राटदारांकडून वसूल केलेली रु.२२.९२ कोटीची सुरक्षा अनामत रक्कम ही रोख दायित्व (cash liability) असल्याने तेवढी रक्कम महामंडळाच्या रोख्यामध्ये वर्ग करण्याबाबत शासनास विनंती करण्यात यावी तसेच इतर महामंडळांबाबत या संदर्भात झालेली कार्यवाही शासनाच्या निदर्शनास आणावी''.

ठराव क्र.१७/५:-

``ठराव करण्यात येतो की,खाली दर्शविलेल्या ११ प्रकल्पांची सुधारित अंदाजपत्रके विहीत मापदंडात बसत असल्याने सदर अंदाजपत्रकाना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यास नियामक मंडळाची मंजूरी देण्यात येत आहे''.

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

| अ.क्र | प्रकल्पाचे नांव | सुधारित प्रशासकीय मान्यतेची किमत रुपये लक्ष |
|---|---|---|
| | जि.कोल्हापूर | |
| १ | कुमरी ल.पा.तलाव,ता.गडहिंग्लज | ३४७.१९ |
| २ | येणचवंडी ल.पा.तलाव,ता,गडहिंग्लज | २६४.३१ |
| ३ | किटवाड, ल.पा.तलाव ता.चंदगड | ९००.६५ |
| | जिल्हा सोलापूर | |
| ४ | अकोले को.प.बंधारा,ता.दक्षिण सोलापूर | १७८.१६ |
| | जि.उस्मानाबाद | |
| ५ | मुर्टा साठवण तलाव, ता.उमरगा | २३३.६९ |
| ६ | भिकारसांगवी साठवण तलाव,ता.उमरगा | १२४६.४६ |
| | जि.बीड | |
| ७ | खुंटेफळ(वाटेफळ) साठवण तलाव ता.आष्टी | १५२.५१ |
| ८ | आष्टी (नि.चो.),बृ.ल.पा.तलाव,ता.आष्टी | ११७८.६० |
| | पुणे जिल्हा | |
| ९ | शेरे ल.पा.तलाव,ता.मुळशी | २०१.०२ |
| १० | वालचंदनगर को.प.बंधारा, ता.इंदापूर | ९७.७४ |
| ११ | ल.पा.तलाव,जाधववाडी,ता.मावळ | २०४६.३३ |

ठराव क्र. १७/५ (ब)

''ठराव करण्यात येतो की, नाझरे को.प.बंधारा ता. सांगोला, जि. सोलापूर या प्रकल्पाचे सुधारित अंदाजपत्रक विहीत मापदंडात बसत नसले तरी अंदाजपत्रकामध्ये

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

झालेली वाढ अत्यल्प असल्याने नाझरे ा.प.बंधा-याच्या रु.१२९.८४ लक्षच्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्यास नियामक ंडळाची मंजूरी देण्यात येत आहे''.

ठराव क्र. १७/५ (क)

''ठराव करण्यात येतो की, सांग ा को. प.बंधारा ता. सांगोला जि. सोलापूर या प्रकल्पाचे सुधारित अंदाजपत्रक विर्हि । मापदंडात बसत नसल्याने तसेच मूळ अंदाजपत्रकामध्ये झालेली मोठी वाढ ल ात घेऊन या प्रकल्पाच्या रु.२०१.५५ लक्षच्या सुधारीत अंदाजपत्रकावर मा.अध्यक्षांच्य तांत्रिक सल्लागाराचे अभिप्राय घेऊन त्यांच्या शिफारशींचा विचार करुन अध्यक्ष, म ्रोविम यांना सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्याचे अधिकार देण्यात येत आहेत. ''

ठराव क्र.१७/६:-

''ठराव करण्यात येतो की, सुध ेत प्रशासकीय मान्यता देण्याच्या कार्यवाहीमध्ये सुलभता आणण्याच्या दृष्टीने ज्या प्रक ाचा खर्च प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीच्या मर्यादेत असताना त्या प्रकल्पांचे सु ेत अंदाज प्राप्त झाले आहेत व सुधारित अंदाजानंतर सुध्दा प्रकल्प विहीत माप ात बसत आहेत, अशा प्रकल्पांच्या सुधारित अंदाजपत्रकास मुख्य लेखा व वित्त अधिकारी (महामंडळ) यांच्या सल्ल्याने व मा.अध्यक्षांच्या सहमतीने सुधारित प्र सकीय मान्यता देण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यास नियामक मंडळाच मंजूरी देण्यात येत आहे.''

ठराव क्र. १७/७

''ठराव करण्यात येतो की,

अ) '' प्रकल्पबाधितांचे लाभक्षेत्रात पुन न करण्यासाठी संपादन करावयाच्या जमिनीचा मोबदला अदा करण्यास 'आयुक पुणे' यांना उचलतत्वावर निधी उपलब्ध करुन द्यावयाच्या कार्यवाहीस मान्यता ण्यात येत आहे. तसेच महामंडळाने बुडीत क्षेत्रातील भूसंपादन व पुनर्वस साठी भूसंपादन यासाठी आयुक्त,पुणे यांना उपलब्ध करुन दिलेला सर्व ी शासनाने महामंडळास परत करण्याबाबत शासनास विनंती करण्यात यावी' .

ब) ''पुनर्वसनाच्या कामासाठी प्रकर ास्तांकडून भरपाईच्या रकमेतून कापून घेण्यात येत असलेली ६५ टक्के रक्कम अधिनियमातील तरतुदीनुसार पुनर्वसनाचा खर्च महामंडळाने करावयाचा असल े शासनाने महामंडळास परत करावा, असे शासनास कळविण्यात यावे''.

मा. मंत्री (प) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

ठराव क्र. १७/८ (अ)

``ठराव करण्यात येतो की, कृष्णा पाणी वाटप लवादाच्या कामकाजासाठी व तत्संबंधी न्यायालयीन प्रकरणां संबंधात नवी दिल्ली, बंगलोर, हैद्राबाद येथे ज्या अधिकारी/कर्मचा-यांना उपस्थित रहावे लागते, त्यांना कामाचे विशेष स्वरुप व दिल्ली, बंगलोर व हैद्राबाद येथील महागडे रहाणीमान विचारात घेऊन १९९९-२००० या आर्थिक वर्षापासून खालील प्रमाणे विशेष भत्ता मंजूर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे``.

| श्रेणी | वेतन मर्यादा रुपये | कृ.पा.तंटा लवाद तत्संबंधी न्यायालयीन प्रकरणांसाठी दिल्ली, बंगलोर व हैद्राबाद येथे देय विशेष भत्ता रुपये |
|---|---|---|
| प्रथम श्रेणी | अ)५१०० व त्याहून अधिक | ४५० |
| | ब) ३००० – ५०९९ | ३६० |
| द्वितीय श्रेणी | अ) २८०० – २९९९ | ३६० |
| | ब) १९०० – २७९९ | २७० |
| तृतीय श्रेणी | अ) १४०० – १८९९ | २०० |
| | ब) १४०० पेक्षा कमी | १५० |

ठराव क्र.१७/८ (ब)

``ठराव करण्यात येतो की, कृष्णा पाणी तंटा लवाद व तत्संबंधी न्यायालयीन प्रकरणांबाबत नवी दिल्ली, बंगलोर व हैद्राबाद येथे उपस्थित रहाण्यासाठी प्रचलीत शासन नियमानुसार जे अधिकारी विमान प्रवासास पात्र आहे अशा अधिका-यांना खास बाब म्हणून विमान प्रवास अनुज्ञेय राहिल``.

ठराव क्र. १७/८ (क)

``ठराव करण्यात येतो की, कृष्णा पाणी तंटा लवाद व तत्संबंधी न्यायालयीन प्रकरणांबाबत नवी दिल्ली, बंगलोर व हैद्राबाद येथे उपस्थित रहाण्यासाठी ज्या अधिकाऱ्यांचे वेतन रु. ३००० ते ४१०० मध्ये आहे, अशा अधिका-यांना सचिवांच्या

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

पूर्वपरवानगीने विमान प्रवास करण्याची परवानगी देण्याचे अधिकार विभाग प्रमुखास देण्यात येत आहेत.''

ठराव क्र. १७/९

''ठराव करण्यात येतो की, मे २००० पर्यंत महामंडळाचा किमान उद्दीष्टपूर्ती कार्यक्रम पूर्ण करावयाचा असल्याने, मा. उपाध्यक्षांनी सुचविलेल्या '१२०० ते २००० एकर सिंचनक्षेत्र असलेल्या उपसा योजना महामंडळाच्या खर्चाने कराव्यात या प्रस्तावावर मे २००० नंतर नियामक मंडळात विचार करण्यात येईल.''

ठराव क्र. १७/१०

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाने आखलेला किमान उद्दीष्टपूर्ती कार्यक्रमांचा प्रकल्प निहाय आढावा व तसेच अडचणी नियामक मंडळाच्या प्रत्येक बैठकीमध्ये मांडण्यात याव्यात.''

ठराव क्र. १७/११

''ठराव करण्यात येतो की, १६ व्या बैठकीतील मंजूर ठराव क्र. १६/१२ नुसार ठेवण्यात आलेला श्री. प्र.ना. बेहेरे, कायदा सल्लागार यांनी केलेल्या कामाचा आढावा स्विकारण्यात येत आहे.''

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे